एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड, न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701 8459953702
एक वेळ अवश्य भेट द्या

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
बीड/महाराष्ट्र गुरुवार २९ ऑगस्ट २०२४ आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ वर्ष २ रे अंक १४ पाने ४ किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता * समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक, सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक
मो.न.9422660077

# कॉँग्रेसचा अंतर्गत सर्व्हे ; महाराष्ट्रात महाविकास आघाडीची सत्ता येणार !



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने देखील अंतर्गत सर्व्हे केला आहे. या सर्व्हेनुसार मविआमधील कोणता पक्ष किती जागा मिळणार याबाबतचा अंदाज समोर आला आहे. काँग्रेसच्या या प्राथमिक सर्व्हेनुसार राज्यामध्ये महाविकास आघाडीची सत्ता येणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. या सर्व्हेनुसार सर्वाधिक जागा ८०-८५ जागा काँग्रेसला मिळण्याचा अंदाज आहे. काँग्रेसच्या अंतर्गत सर्व्हेबाबत समोर आलेल्या माहितीनुसार काँग्रेसला ८० ते ८५ जागा मिळण्याचा अंदाज आहे. शरद पवारांच्या पक्षाला ५५ ते ६० जागा तर उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला ३० ते ३५ जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर या सर्व्हेनुसार भाजपला ६०-६२ जागा मिळण्याचा अंदाज आहे. शिवसेना शिंदे गटाला ३०-३२ तर अजित पवारांच्या पक्षाला ८-९ जागा मिळण्याचा अंदाज आहे. काँग्रेसच्या या प्राथमिक सर्व्हेत महाविकास आघाडीची सत्ता येण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान विधानसभा निवडणूकीत भाजपचं मिशन १२५ सुरू आहे. राज्यातील ५० जागा भाजपने निश्चित केल्या आहेत. या जागांवर भाजप सहज निवडून येऊ शकतात. मात्र, इतर ७५ जागांवर निवडून आणण्यासाठी भाजपकडून विशेष रणनीती आखली जात आहे. या ७५ जागा निवडून आणण्याची राज्यातील बड्या नेत्यांवर जबाबदारी आहे. प्रत्येक बड्या नेत्यावर विधानसभेचे ७-८ मतदारसंघाची जबाबदारी देण्याचं नियोजन आहे. त्या नेत्यांनी आपला अहवाल नेतृत्त्वाकडे द्यायचा आहे. भाजपकडून त्या त्या नेत्यांचे दौरे सुरू आहेत.



## माजी आमदार संगीता ठोंबरे यांच्या गाडीवर दगडफेक गाडीचा चालक आणि माजी आमदार जखमी

**केज । सचिन भालेराव**

केज विधानसभेच्या माजी आमदार प्रा. संगीताताई ठोंबरे या केज तालुक्यातील दहिफळ वड माऊली येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त दहिफळ वडगाव येथ गेले असता अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करून सायंकाळी ६:०० वाजता त्या ऋषी गदळे घरी चहापाण्यासाठी जात असताना विजय उत्तमराव गदळे यांनी त्यांच्या गाडीवर दगडफेक केली. यात गाडीचा ड्रायव्हरच्या बाजूचा काच फुटून तो दगड गाडीचा चालक किशोर बबन मोरे याला लागला. त्या नंतर तोच दगड गाडीमध्ये बसलेल्या माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांना लागून त्याही जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपजिल्हा रुग्णालय केज येथे उपचार चालू आहे दरम्यान याप्रकरणी पोलिसात तक्रार नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## ॲड. प्रकाश आंबेडकरांच्या पुढाकाराने बार्टी संशोधक विद्यार्थ्यांना मिळाला न्याय

### विद्यार्थ्यांनी वंचित बहुजन आघाडीकडे मांडली होती व्यथा

**बोरघर । प्रतिनिधी**

राज्यातील महत्वाच्या प्रश्नांच्या संदर्भात रविवारी राज्य मंत्रीमंडळाची झाली. यामध्ये बार्टीच्या ७६३ संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. शुक्रवारी दिनांक २३ रोजी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांची भेट घेऊन त्यांच्यासमोर विद्यार्थ्यांनी व्यथा मांडली. ॲड. आंबेडकर यांनी या संदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. त्याची दखल घेऊन आज विद्यार्थी



हिताचा निर्णय घेण्यात आला.

मागील अडीच वर्षांपासून बार्टी संशोधक विद्यार्थ्यांचा अधिछात्रवृत्तीचा प्रश्न प्रलंबित होता. या प्रश्नाला घेऊन विद्यार्थ्यांनी अनेक आंदोलने केली. पायी लाँग मार्च काढला तरीही सरकार या प्रश्नाबाबत सकारात्मक नसल्याचे दिसत होते. या संदर्भात विद्यार्थ्यांनी ॲड. प्रकाश आंबेडकर यांची आरक्षण बचाव यात्रेच्या दरम्यान महात्मा फुले वाडा येथे भेट घेऊन चर्चा केली होती.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. शुक्रवारी दिनांक २३ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांनी मुंबई येथील वंचित बहुजन आघाडीच्या मध्यवर्ती कार्यालयात ॲड. आंबेडकर यांची भेट घेतली. ॲड.आंबेडकर यांनी या प्रकरणी मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. त्यामुळे राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आल्याने विद्यार्थ्यांनी ॲड. आंबेडकर आणि वंचित बहुजन आघाडीला धन्यवाद दिले आहेत.

## मुख्य कार्यकारी अधिकारी सिल्लोड ला येताच सोयगाव तालुक्यातील कर्मचारी अलर्ट

छत्रपती संभाजीनगर(चैताली औटे)

जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ विकास मीना हे सिल्लोड मध्ये कार्यक्रमासाठी असताना कधी नव्हे ते बुधवारी सोयगाव तालुक्यात जिल्हा परिषद यंत्रणेचे सर्वच आरोग्य,शिक्षण ग्रामपंचायती आदी कर्मचारी सोयगाव सह ग्रामीण भागात अलर्ट झाले होते. दुपार नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी सिल्लोड वरून छत्रपती संभाजीनगर कडे रवाना होताच सोयगाव तालुक्यातील कर्मचाऱ्यांनी सुटकेचा श्वास सोडला.

कर्मचारी गैरहजर राहणे हे तालुक्यात नित्याचे असताना बुधवारी मात्र तालुक्यातील ग्रामीण भागात सर्वच जिल्हा परिषद कर्मचारी अलर्ट होते त्यामुळे कधीही न भेटणारे कर्मचारी बुधवरी थेट गावात हजर झाले होते त्यामुळे नागरुकांनी आश्चर्य व्यक्त होत होते दुपारी मात्र अचानक हजर असलेले कर्मचारी पुन्हा गायब झाले होते.

## श्री.खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात गोपाळकाला कार्यक्रम उत्साहात साजरा.

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

:दि. २७ रोजी श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात कृष्णजन्माष्टमी निमित्त दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बाबुराव आडे,प्रमुख वक्ते म्हणून अभ्यास पूरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,उपमुख्याध्यापक माधव जोशी,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,कार्यक्रम प्रमुख सतीश बलुतकर यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.प्रमुख पाहुणे श्रीकांत देशपांडे यांनी कृष्णाच्या बाल कथा विद्यार्थ्यांना सांगितल्या. गो सेवेचे महत्त्व श्रीकृष्णाने स्वतःच्या कृतीतून दाखवून दिले आहे.प्रेम,जिव्हाळा,एकत्रीकरण याची जाणीव करून देणारा



उत्सव म्हणजे गोपाळकाला होय असे मत व्यक्त केले. हा कार्यक्रम बलोपासक मंडळांतर्गत घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक,परिचय, स्वागत ज्योती घोडके यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी गवळण,कृष्णांची गाणी गायली. आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी मानवी मनो-याचे सादरीकरण केले नंतर ढोल ताशांच्या गजरात दोन्ही विभागात दहीहंडी फोडली. याउत्सवाचा आनंद विभागातील सर्व शिक्षक व विद्यार्थीनी घेतला.काल्याचा प्रसाद घेऊन दही हंडी उत्साहात साजरी केली .या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठीमुख्याध्यापकांच्यामार्गदर्शनाखाली,कार्यक्रम प्रमुख सतीश बलुतकर व सर्व शिक्षकांनी परीश्रम घेतले.

# महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून आज राजकोट किल्ल्यावरील पुतळ्याची पाहणी

## आपटे कोणी शोधला? नेव्हीला त्याची माहिती कोणी दिली? तो कल्याणचाच कसा? या पुतळ्याचे टेंडर न काढता त्यालाच कसे कंत्राट मिळाले?

### प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचा संतप्त सवाल सरकारने जबाबदारी झटकू नये, शिवप्रेमींची माफी मागावी – जयंत पाटील

मालवण :- महाविकास आघाडीतर्फे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी राजकोट किल्ल्यावरील घटनास्थळी भेट दिली तत्पूर्वी जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. यावेळी बोलताना जयंत पाटील म्हणाले की की, फक्त आठ महिन्यांपूर्वी बांधलेला राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पडला. हा पुतळा पडला नसून महाराष्ट्राचा स्वाभिमान पडला आहे. मुख्यमंत्री म्हणतात प्रचंड वेगाने वारे वाहत होते. त्यामुळे पुतळा पडला. तसं असतं तर दोन-तीन झाड पडली असती पण तसं न होता फक्त पुतळा पडला याचा अर्थ पुतळ्याच काम सदोष होतं. अपरिपक्व माणसाला पुतळ्याचे काम दिले. दीड - दोन फुटांचे पुतळे तयार करणाऱ्या व्यक्तीला ३५ फुटाच्या पुतळ्याचे काम दिले. सरकार म्हणतंय पुतळा नेव्हीने बांधला आहे. सरकारला हात झटकून चालणार नाही, यात सरकार जबाबदारी ही सरकारची आहे. नेव्हीच्या लोकांनी फक्त पुतळा तिथे बसवला. हा शिल्पकार आपटे कोणी शोधला? कोणी नेव्हीला त्याची माहिती दिली? तो कल्याणचाच कसा? या पुतळ्याचे टेंडर काढले गेले नाही मग त्यालाच कसे कंत्राट मिळाले? या सर्व गोष्टींची चौकशी व्हायला पाहिजे अशी मागणी त्यांनी केली. सरकारने कोणतीही शहानिशा न करता गुन्हा कसा दाखल केला? गुन्हा दाखल करणे म्हणजे आपण काही तरी करतोय हे दाखवण्याचा केविलवाणा खटाटोप सरकार करत आहे अशी टीका असताना सरकारला तोंड दाखवायला जागा राहिली नाही. सरकार काम फक्त टेंडर काढणे, जवळच्या लोकांना कंत्राट देणे, त्या कामाचा इव्हेंट करणे त्यापलीकडे सरकार काहीच करायला तयार नाही असा आरोप त्यांनी केला तसेच सरकारने राज्यभरातील शिवप्रेमींची माफी मागावी असेही ते म्हणाले. दरम्यान या प्रकरणाची जर सरकारला खरंच चौकशी करायची असेल तर दोन्ही सभागृहाच्या विरोधी पक्षनेते आणि मुख्यमंत्र्यांनी बसून उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांची निवड करावी आणि त्यांच्या अध्यक्षतेखाली ही चौकशी करावी अशी मागणी त्यांनी केली. शिवरायांच्या पुतळ्यात भ्रष्टाचार करणारे हे सरकार जाईल आणि रयतेचे राज्य येईल स्थानिक मंत्री सांगतायत की, 'या वाईटातून काहीतरी चागलं होईल'. मला अशा मंत्र्यांच्या बुध्दीची कीव वाटते. मंत्री महोदय नक्कीच चांगलं होणार, शिवरायांच्या पुतळ्यात भ्रष्टाचार करणारे हे सरकार जाईल आणि रयतेचे राज्य येईल. ज्यांना 28 फुटाचा व्यवस्थित पुतळा उभारता आला नाही ते आता 100 फुटाची चर्चा करतायत असा टोलाही शेवटी त्यांनी लगावला.

# नशामुक्त भारत अभियानांतर्गत विद्यार्थींनी फोडली अंमली पदार्थ विरोधी दहीहंडी

जव्हार : नशामुक्त भारत अभियानांतर्गत जिल्हा परिषद पालघर समाजकल्याण विभाग, शिक्षण विभाग जिल्हा परिषद शाळा काळीधोड आणि नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने अंमली पदार्थ विरोधी दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम २७ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद शाळा काळीधोंड जव्हार जिल्हा पालघर येथे घेण्यात आला. भारतीय संस्कृतीमध्ये विविध समारंभ खूप उत्साहात साजरी केले जातात परंतु या उत्साहातून व्यसनाची सवय लागू नये याकरिता युवकांनी किशोरवयीन बालकांनी सजग राहणे गरजेचे आहे. तंबाखू, दारू, मावा, खर्रा, सिगारेट, ड्रग्स याची सवय लागू नये व ज्यांना सवय जडली आहे त्यांना



यापासून मुक्ती मिळावी. यासाठी तरुण युवकांनी एकत्र येऊन नशामुक्त भारत अभियानांतर्गत अंमली पदार्थ विरोधी दहीहंडी फोडली प्रत्येकाने व्यसनमुक्त राहणे गरजेचे आहे असा संदेश अंमली पदार्थ विरोधी दहीहंडीच्या माध्यमातून देण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नशामुक्त भारत अभियानाचे सदस्य नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे पालघर जिल्हा समन्वयक श्री मिलिंद पाटील व जिल्हा परिषद शाळा काळीधोंड जव्हार चे मुख्याध्यापक सौ. प्रज्ञा मुकणे उपस्थित होते. यावेळी बोलताना मिलिंद पाटील म्हणाले की व्यसनामुळे संपूर्ण कुटुंबाचा ऱ्हास होतो व्यसनामुळे विविध आजार जडले जातात. व्यसन लागल्यानंतर सुटण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात प्रयत्न करावे लागतात परंतु व्यसन लागूच नाही यासाठी प्रयत्न करणे खूप गरजेचे आहे त्यामुळे कोणत्याही युवकांनी व्यसन लागू नये यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना करण्यात आले. तर या दहीहंडीचा मुख्य उद्देश कोणत्याही युवकाने कोणतीही नशा करू नये हा होता कार्यक्रमांची सांगता सौ. दर्शना मुकणे यांनी अंमली पदार्थ विरोधी शपथ घेऊन करण्यात आली.

## शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी याची २५ हजार रुपयाची मदत..





मारतळा / प्रतिनिधी मारतळा : शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरूजी यांनी अंजली अनिल मोरे रा.आंचोली ता.नायगांव येथील गरीब शेतकऱ्यांच्या मुलीच्या मेंदूच्या ओपरेशन साठी तब्बल 25,000.₹ चे आर्थिक मदत केली आहे. व्हि.पि.के उद्योग समूहाचे अध्यक्ष शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरूजी नायगाव मतदार संघात गोरगरीब लोकांच्या अडचणी सोडविण्यासाठी नेहमीच धावून जात असतात, एकदा ठिकाणी आत्महत्या झाली असेल किंवा अपघातातून मुत्यू झाले असल्यास अशा कुटुंबाचा कर्ता पुरुष गेल्यानंतर ते कुटुंबावर मोठं आर्थिक संकट येते अशा अनेक कुटुंबाला गुरूजींनी फुल नाही फुलांची पाकळी म्हणून मदत करतात. आज तर त्यांचे मन किती मोठे आहे हे दिसले आंचोली येथील एका गरीब शेतकऱ्यांच्या मुलीच्या मेंदूचे ओपरेशन होते त्या कुटुंबावर मोठे संकटच कोसळले होते त्यांना ऐवठा पैसा कुठून आणायचा हा प्रश्न पडला त्यांना कोणत्या आमदारान मदत केली नाही किंवा स्वतः ला भावी आमदार म्हणून घेणारा नेता पुढे आला..पुढे आले ते तर फक्त गरिबीची जान असलेले, सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या कुटुंबात जन्मलेला शेतकरी नेता

# आष्टी येथील मराठवाड्यातील सर्वात मोठ्या कृषी प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा – डॉ हरिदास शेलार

**जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी, व्यावसायिकांनी , नागरीकांनी लाभ घेण्याचे आवाहन डॉ हरिदास शेलार यांनी केले आहे.**

पाटोदा (प्रतिनिधी) शेतकऱ्यांचे नेते मा.आ.भिमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून मराठवाड्यातील सर्वात मोठे आष्टी तालुक्यात दुसऱ्यांदा कृषी प्रदर्शन संपन्न होत आहे. यामध्ये भारतातील सर्वात उंच ५१ लाखाचा सोन्या नावाचा कोसा बैल प्रमुख आकर्षण असणार आहे. यासोबतच लाडक्या बहिणींसाठी उद्धव के.पी. प्रस्तूत महाराष्ट्रभर गाजत असलेला महिला भगिनींचा एकमेव आवडता कार्यक्रम खेळ पैठणीचा, शेतकऱ्यांच्या मनोरंजनासाठी रोज सायंकाळी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत पारंपारीक लोकगीते, लोककला,नाटक, शास्त्रीय संगीत, शेतकरी गीते, लोकनृत्य यांचे सादरीकरण करण्यात येतील.यासह बरेच काही असणार आहे. शेती व ग्रामीण भागातील बदलत्या तंत्राची महत्त्वपूर्ण माहिती मिळणार असल्याने आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघासह जिल्ह्यातील व्यावसायिक व शेतकरी वर्गाने,कृषी प्रदर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन डॉ हरिदास शेलार यांनी केले आहे. आष्टी शहरात मा.आ.भिमरावजी धोंडे साहेब यांच्या संकल्पनेतून मराठवाड्यातील सर्वात मोठे राज्य स्तरीय कृषी प्रदर्शन दि .२९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयासमोर कृषी प्रदर्शन सभामंडपात संपन्न होत आहे.या प्रदर्शनाचे उद्घाटन कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे व लोकनेत्या आ. पंकजाताई मुंडे,आदर्श सरपंच पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत



होणार आहे.सांगली येथील व देशातील सर्वात उंच ५१ लाख रुपये किमंतीचा खिलार कोसा जातीचा सोन्या बैल प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने चार दिवस दररोज दुपारी १२ ते २ या वेळेत कृषी संबंधित तज्ञांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे. कृषी प्रदर्शनासाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या नावांमधून दर तासाला लकी ड्रॉ काढण्यात येईल व लकी शेतकऱ्यांला शेती उपयोगी भेट वस्तू देण्यात येईल. शेवटच्या दिवशी बंपर लकी ड्रॉ काढुन विजेत्याला बक्षीस दिले जाईल. कृषी प्रदर्शनात दुध उत्पादक शेतकऱ्यांसाठी वेगवेगळे अत्याधुनिक मशिन, कुक्कुटपालन माहिती तसेच बँके मधून लोन कसे काढायचे यांची माहिती मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या मनोरंजनासाठी रोज सायंकाळी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत पारंपारीक लोकगीते, लोककला, नाटक, शास्त्रीय संगीत, शेतकरी गीते, लोकनृत्य यांचे सादरीकरण करण्यात येतील.आयोजक वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी संलग्न श्री छत्रपती,शाहु,फुले, आंबेडकर महाविद्यालय आष्टी आहेत. हे प्रदर्शन मोफत आहे त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी, व्यावसायिकांनी , नागरीकांनी लाभ घेण्याचे आवाहन डॉ हरिदास शेलार यांनी केले आहे.

# शिवसेना शाखा क्रमांक १९४ तर्फे दही हडी उत्सव मोठया जल्लोषात साजरा

. उरण (सुनिल ठाकूर ): सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील कार्यसम्राट आमदार तथा सिद्धिविनायक मंदिर न्यासाचे अध्यक्ष मा. श्री सदा सरवणकर, कार्य तत्पर नगरसेवक समाधान सरवणकर, महिला महिला विभाग प्रमुख प्रिया सरवणकर, यांच्या मार्गदर्शना खाली शिवसेना क्र. 194 तर्फे शाखा प्रमुख संतोष तेलवणे, शाखा समन्व्यक सुभाष उर्फ बाबू ठाकूर, महिला शाखा प्रमुख मंदा भाटकर, शाखा संघटक संदेश बेरडे यांच्या आयोजना खाली दही हंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दही हंडीसोहळ्यास माहीम विधान सभा प्रमुख कुणाल वाडेकर,भाई परब (विधानसभा समन्व्यक ), विधान सभा संघटक गणेश कदम, शिवसेना महाराष्ट्र एस.




टी. कामगार सेना उपाध्यक्ष् श्रेयश पाडावे, आदि मान्य वरांनी भेट दिली. सदर दही हंडी सोहळा पार पाडण्या साठी शिवसेना 194 चे शाखा प्रमुख संतोष तेलवणे, शाखा समन्व्यक सुभाष (बाबू )ठाकूर, महिला शाखा प्रमुख मंदा भाटकर,उप विभाग प्रमुख अश्विनी कुलकर्णी, महिला शाखा समन्व्यक रोहिणी भाकरे, महिला शाखा संघटक जानवी कुंभार, सह संघटक अंजलीसौदालकर,संतोष खंदारे (उपशाखा प्रमुख ), दिलीप चव्हाण (उपसमन्वयक ), दिलीप परमार (उपशाखा प्रमुख ), सुरेश जकानी (उपशाखा प्रमुख ), संजय तोडणकर (गट प्रमुख ), अशोक कापसे (गट प्रमुख ) आदी पदाधिकारी सह कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

## विक्रोळी कन्नमवार नगर येथे मोफत आरोग्य शिबीर संपन्न



मुंबई ।प्रतिनिधी: विद्या विकास एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन शिक्षण महर्षी दिवंगत प.म.राऊत सर यांच्या स्मरणार्थ डॉ. रश्मी जीवन जाधव, अपोलो हॉस्पिटल आणि प्रो. जीवन जाधव सोशल ट्रस्ट आयोजित विकास हायस्कूल प्रायमरी इंग्लिश स्कूल चे कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी मोफत आरोग्य शिबिर विकास हायस्कूलच्या सभागृहात संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन डॉ. अनघा राऊत यांच्या शुभ हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून एसीपी शुभदा चव्हाण उपस्थित होत्या. तसेच डॉ . मेघा परब, श्रीम. विजया राधाकृष्णन विशेष निमंत्रित म्हणून आणि संचालक , शुश्रुषा हॉस्पिटल ,वृत्तपत्र लेखक कृष्णा काजरोळकर उपस्थित होते.यावेळी ३०० जणांनी शिबिराचा लाभ घेतला. यावेळी तज्ञ डॉ. सोनाली चव्हाण(डेन्टीश), डॉ. गिरीश सावकरे (ऑर्थो, स्पायन सर्जन), वैभव ऑप्टिशियन आणि डॉ. रश्मी जीवन जाधव (डायटिशियन) यांच्या सहकार्याने रक्तदाब, मधुमेह, ईसीजी, बीएमडी, पीएफटी तसेच डोळ्यांची, दातांची तपासणी आणि आहार विषयक सल्ला देण्यात आला. प्रो. जीवन जाधव यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात संस्थेबद्दल सविस्तर माहिती देऊन मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तर डॉ. रश्मी जीवन जाधव यांनी आभार प्रदर्शन करताना विद्या विकास एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. विनय राऊत आणि श्रीम. विजया राधाकृष्णन, मुख्याध्यापिका यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले.

# शाळा महाविद्यालयात मुलींना निर्भय वातावरण देण्यास प्रशासनाची कटिबद्धता-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

जिल्ह्यात प्रत्येक शाळा- महाविद्यालयात सखी सावित्री समिती कार्यान्वित करावी. तसेच शाळेतील वातावरण मुलींना सुरक्षित व निर्भय वाटावे यासाठी समुपदेशन व जनजागृतीपर विविध उपक्रम राबवावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. मुलींना निर्भय वातावरण देण्यास प्रशासन कटीबद्ध असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील सर्व गटशिक्षण अधिकारी, उच्च शिक्षण विभागाचे अधिकारी, पोलीस प्रशासन, शाळा- महाविद्यालयाचे मुख्याध्यापक व प्राचार्य, प्रतिनिधी यांच्या बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, शिक्षण अधिकारी श्रीमती जयश्री चव्हाण, शिक्षण उपसंचालक कार्यालयातील सहाय्यक संचालक वाणी, उच्च शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी वनिता सांजेकर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी यांनी निर्देश दिले की,प्रत्येक शाळा महाविद्यालयांमध्ये मुला मुलींचे समुपदेशन, शाळेच्या दर्शनी भागामध्ये तक्रारपेटी, संबंधित पोलीस स्टेशन व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांचे फोन नंबर तसेच ११२ हा टोल फ्री नंबर उपलब्ध करून द्यावा.मुलींनी केलेल्या तक्रारीची तात्काळ दखल घ्यावी. सर्व यंत्रणांनी याबाबत संवेदनशीलपणे काम करावे.पोलीस विभागाच्या मदतीने शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेस पेट्रोलिंग, पोलीस दीदी व पोलीस काका यांची उपलब्धता करावी.

शाळेमध्ये वेळोवेळी भेटी देऊन गुड टच बॅड टच बाबत मुला मुलींना प्रशिक्षण द्यावे. जिल्हा पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड यांनी सर्व शाळेमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करून ११२हा टोल फ्री नंबर संपर्कासाठी उपलब्ध आहे. तक्रार दिल्यानंतर तात्काळ यावर कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी सांगितले की,जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शाळेमध्ये विद्यार्थिनी व पालक संवाद मेळावा आयोजित करावा. गुड टच बॅड टच,स्वसंरक्षण बाबत प्रशिक्षण द्यावे .

## महावितरण व त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या अहवाला विरोधात वाजेद पटेल यांचे आमरण उपोषण

अंबाजोगाई । परवेज पटेल अंबाजोगाई महावितरण अंबाजोगाई व त्याच्या अधिकारी व कर्मचारी यांनी वाजेद पटेल यांचे दुकान जळल्याप्रकरणी चुकीचा अहवाल दिल्याने त्याविरोधात वाजेद पटेल यांनी अंबाजोगाई येथे उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे याप्रकरणी सविस्तर वृत्त असे की दिनांक २६ मार्च २०२४ रोजी सदर बाजार परिसरात मुकुंदराज विद्यालयाच्या शॉपिंग कॉम्प्लेक्स मध्ये वाजेद पटेल यांचे दानिश कलेक्शन या कपड्याच्या दुकानाला शॉटसर्किटने आग लागली होती. या आगीमुळे दुकानातील दुकानातील अंदाजे २५ लाखाचे कपडे व इतर साहित्य जळून खाक झाले आहे. या घटनेची माहिती तात्काळ अग्निशमन दल पोलीस प्रशासनास दिली होती. घडलेल्या घटनेचा पोलीस पंचनामा देखील करण्यात आला. महावितरणच्या अभियंता यांनीही घटनास्थळी पेवून पंचनामा केला. यामध्ये शेजारच्या दुकानदाराचे जवाबही नोंदविण्यात आले. परंतु महावितरण कंपनीने तब्बल चार महिन्यानंतर या जळीत प्रकरणाचा निष्कर्ष अहवाल सादर केला. या निष्कर्ष अहवालात विद्युत निरीक्षक यानी असे नमूद केले की, माझ्या दुकानात अंतर्गत संचाने दुकानाला आग लागून ही घटना घडली. या चुकीच्या अहवालामुळे माझे कुटुंब अक्षरशः उघडयावर पडले असून माझ्या कुटुंबाची उपजिवीका भागविण्याचे साधन संपले आहे. या जळीत घटनेची सविस्तर पार्श्वभूमी अशी की दिनांक २५/०३/२०२४ रोजी माझ्या दुकानासमोर असलेल्या डी.पी. मधून विज दाब कमी जास्त होत होता. तसेच ज्या पोलवरून माझ्या दुकानात विद्युत कनेक्शन देण्यात आले होते त्या पोलवर स्पार्किंग देखील होत होती. यामुळे बीज दाब कमी जास्त होत होता. पोलवर स्पार्किंग होत आहे म्हणून मी व माझ्या शेजारील दुकानदारानी लाईनमन पांचाळ यांना मोबाईलवर कॉल करून वीज दाब कमी जास्त होत आहे. तसेच पोलवरुन स्पार्किंग होत आहे याची माहिती दिली. या तक्रारीची लाईनमन पांचाळ यानी कसलीही दखल न घेता निष्काळजीपणा करुन दुसरा मोबाईल क्रमांक सांगत तिथे या क्रमांकावर तुमची तक्रार नोंदवा असे सांगितले. नंतर तिथेही कोनी कॉल घेत नसल्याची माहिती दिली. यावर देखील दि. २५/०३/२०२४ रोजी वारंवार कॉल करून कुणीही महावितरण कंपनीचे कर्मचारी घटनास्थळी आले नाहीत. विशेष म्हणजे पटेल यांच्या दुकानात अंदाजे २५.०० लाखाचा कपड्याचा माल भरलेला होता. दैनंदिन प्रमाणे दि. २५/०३/२०२४ च्या रात्री दुकान बंद करून घरी गेले असताना दि. २६ मार्च २०२४ रोजीच्या पहाटे पटेल यांना मित्राचा फोन आला की, तुमच्या दुकानातुन मोठ्या प्रमाणात धूर निघत आहे. तेव्हा तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन दुकानाचे शटर



उघडून पाहिले असता अख्खे दुकान जळून खाक झाल्याचे दिसून आले. तेथे अग्निशामन दलाचे जवान घटनास्थळी येऊन आग अटोक्यात आनली. पोलीस प्रशासनाने देखील घटनास्थळी येऊन पंचनामा करून शेजारी असलेल्या दुकानदाराचे जवाब नोंदविले. प्रत्येक दुकानदाराने आपल्या जवाबात स्पष्ट सांगितले की, दुकना समोरील डि.पी. तुन विज दाब कमी-जास्त होत होता. तसेच पोलवर स्पार्किंग होत होती. परंतु संबंधीत विद्युत निरीक्षक यांनी चार महिन्यानंतर दिलेल्या अहवालात माझ्या दुकानातील वीज संचात दोष दाखवून महावितरणने स्वतःची चुक झाकण्याचे काम केले. त्यानंतर या सर्व बाबींचा पाठ पुरावा केला असता असे दिसून आले की, दुकानासमोरील पोलवरुन जे कनेक्शन माझ्या दुकानाच्या वीज मिटरमध्ये देण्यात आले होते ते कनेक्शन थेट न देता मिटरला पोलवरुन येणाऱ्या केबल गुंडाळून कनेक्शन देण्यात आले होते. मीटरला केबल गुंडाळलेले असल्याने त्यात कॉईल तयार होवून हा शॉटसर्किट झाला असवा. दुकानाला वीज मिटर देतांना सर्व टेस्ट रिपोर्ट घेवूनच मिटर देण्यात आले होते. तर मग माझ्या दुकानातील वीज संचात दोष कसा असू शकतो. एकंदरीत विद्युत निरीक्षक यांनी दिलेला अहवाल चुकीचा असून या घटनेची फेर तपासणी करुन मला न्याय देऊन झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई देण्यात यावी व कर्तव्यात कसुर करणारे लाईनमन पांचाळ व संबंधीत विद्युत निरीक्षक वाय.बी. शेंगुळे यांना तात्काळ निलंबीत करण्यात यावे. उपरोक्त बाबींची गाभिर्यपुर्वक विचार करुन मला तात्काळ न्याय देण्यात यावा या मागणीसाठी वाजेद पटेल यांनी दि २७ मंगळवार पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या या न्याय मागणीसाठी पटेल यांना सर्व स्तरातून पाठिंबा मिळत

## शेकापतर्फे उरण मध्ये दहीहंडी उत्साहात संपन्न.


### पोलिसांच्या कार्याला दिली गोविंदांनी सलामी

उरण । विठ्ठल ममताबादे महाराष्ट्रात सर्वत्र दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. उरण मध्ये पारंपारिक पद्धतीने दहीहंडी साजरा करण्याची गावोगावी पद्धत आहे. शेतकरी कामगार पक्षातर्फे उरण मध्ये शेकापचे रायगड जिल्हा खजिनदार प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या संकल्पनेतून भव्य "दहीहंडी-२०२४" चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पाच, सहा आणि सात थर लावणाऱ्या गोविंदा पथकांना रोख पारितोषिक आणि सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. पिरकोन येथील वाघेश्वर गोविंदा पथकाने गेल्या काही दिवसांमध्ये पोलिसांनी केलेल्या कामगिरीबद्दल उरण पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना चार थराची सलामी देऊन उपस्थित सर्व पोलीस अधिकारी वर्गाला सन्मान दिला. सदर दहीहंडी फोडण्याचा मान वाघेश्वर मित्र मंडळ पिरकोनने पटकावले.



यावेळी पनवेलचे आदर्श माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, शेकाप रायगड जिल्हा खजिनदार प्रितम म्हात्रे,महादेवशेठ बंडा, नरेशशेठ घरत,एल बी पाटील सर, काका पाटील, रमाकांत पाटील, विकासशेठ नाईक, शेखर पाटील,सीमाताई घरत, रमाकांत म्हात्रे, रवी घरत आणि शेकाप महिला पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करून दहीहंडी उत्सवाचा आनंद लुटला.

## राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी सुभाष राऊत



(बीड-विवेक कुचेकर) राज्याच्या अन्न आयोगाच्या अध्यक्ष पदाची सुत्रे समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष सुभाष राऊत यांच्याकडे देण्यात आली आहेत. सुभाष राऊत यांची दोन दिवसांपूर्वीच अन्न आयोगावर सदस्य म्हणून निवड झाली होती. आता त्यांच्याकडे अध्यक्षपदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. या पदाला राज्यमंत्री दर्जा आहे. समता परिषदेचे बीड जिल्हा अध्यक्ष तथा प्रदेश उपाध्यक्ष असलेले सुभाष राऊत हे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचे अत्यंत निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. आता छगन भुजबळ यांच्या शिफारशीवरून त्यांना दोन दिवसांपूर्वी अन्न आयोगावर सदस्य म्हणून नियुक्ती देण्यात आली होती. या आयोगाचे अध्यक्षपद रिक्त असल्याने त्यांना या पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. या निवडीबद्दल सुभाष राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री छगन भुजबळ, बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे, समीर भुजबळ, पंकज भुजबळ यांचे आभार मानले आहेत.

## रुजू झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी प्रशिक्षणार्थी महिला मुख्याधिकाऱ्याचा विनयभंग

### मद्यधुंद एका राजकीय नेत्यासह त्याच्या एका साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल

**जालना/असलम कुरेशी**

रुजू झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी प्रशिक्षणार्थी महिला मुख्याधिकाऱ्याचा विनयभंग झाल्याची घटना समोर आली असून याप्रकरणी मद्यधुंद एका राजकीय नेत्यासह त्याच्या एका साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार जालना जिल्ह्यातील मंठा शहर नगर पंचयातमध्ये प्रशिक्षणार्थी मुख्याधिकारी म्हणून सोमवारी (ता. २६) रोजी एक ३८ वर्षीय महिला अधिकारी रुजू झाल्या आहेत. नुकत्याच रुजू झाल्यामुळे त्यांची तात्पुरती निवासव्यवस्था मंठा शहरातील शासकीय विश्रामगृहातील एका खोलीत करण्यात आलेली आहे. काल सदर महिला अधिकारी आपल्या खोलीत थांबलेल्या असतांना मद्यधुंद अवस्थेत असलेले दोन इसम त्यांच्या खोलीत घुसले. त्यापैकी एकाने मी भाऊसाहेब गोरे असून, मी डीपीटीसी मेम्बर आहे, आम्ही तुम्हाला सहकार्य करण्यासाठी आलो आहोत, असे सांगितले. त्यावेळी सदर महिला अधिकाऱ्याने मला तुमच्या सहकार्याची गरज नाही, असे म्हणत खोलीतून बाहेर जाण्यास सांगितले. तरीही त्या दोघांनी खोलीतून बाहेर न जाता खोलीतच थांबून सदर महिला अधिकाऱ्यांच्या मनास लज्जा वाटेल असे वर्तन करून, विनयभंग केला. हे दोघे तेवढ्यावरच थांबले नाही तर त्यांनी त्यांना धमक्या देत अर्वाच्य भाषा वापरली. याप्रकरणामुळे भयभीत झालेल्या या महिला अधिकाऱ्याने काल रात्री तातडीने जालना येथे येऊन जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आणि अप्पर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांची भेट घेऊन आपबित्ती सांगितली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांच्याशी संपर्क साधून तात्काळ गुन्हा नोंदविण्याची सूचना केली. त्यानुसार काल रात्री उशिरा कदीम जालना पोलीस ठाण्यात सदर महिला अधिकाऱ्यांच्या फिर्यादीवरून संशयित आरोपी भाऊसाहेब गोरे व त्याचा एक साथीदार अशा दोन जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या ७४, ३२९ (१), ३ (५) कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा पुढील तपासासाठी मंठा पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक भारती हे करीत आहेत.

## प्रत्येक तालुक्यात उद्योगासाठी भूखंड आरक्षित करावे-जलज शर्मा यांचे आदेश

**नाशिक । सुरेश इंगळे**

अखेर आठ महिन्याच्या प्रदीर्घ काळानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात झूम बैठक झाली. त्यात जवळजवळ ४२ विषय अजेंड्यावर होते, तसेच ऐनवेळी त्यात ३० विषयाचा समावेश करण्यात आला. प्रत्येक तालुक्यात उद्योगासाठी १०० ते ५०० एकर आकाराचे भूखंड आरक्षित करावे, त्यासाठी जागा निश्चित करण्याची प्रक्रिया राबवावी , भूसंपादनासाठी एक उपसमिती नेमावी, असे आदेश जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी जिल्हा उद्योग मित्र अर्थात झुम च्या बैठकीत दिले. या उपसमीतीत प्रांताधिकारी, एमआयडीसी अधिकारी ,आणि उद्योजकांचा एक प्रतिनिधी असेल, असेही या बैठकीत स्पष्ट करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादनाबरोबरच वीज पुरवठा, आणि अतिक्रमण प्रश्न यावर तोडगा काढण्यासाठी उप समित्या गठीत करण्याचे आदेश दिले. यावेळी महिलांच्या औद्योगिक समूहासाठी भूखंडाचे वाटप करावे ,एमआयडीसी ने वीस पटीने वाढविलेले फायर चार्जेस, सांडपाणी प्रकल्प, खुल्या खंडांना संरक्षण भीत, रस्त्याची दुरवस्था, नियमित वीजपुरवठा, वसाहतीत पोलीस चौकी उभारणे, एलबीटी या अन्य विषयावर चर्चा झाली. उद्योगाशी निगडित कामे तातडीने मार्गी लावावे अशा प्रकारचे सर्वच विभागांना आदेश दिले. यावेळी निमा अध्यक्ष धनंजय बेळे यांनी उद्योजकांना भेडसवणाऱ्या समस्यांची मांडणी केली. आयमा अध्यक्ष ललित बुम, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणे, भाजप उद्योग आघाडीचे प्रदीप पेशकार, राजेंद्र अहिरे, रवींद्र झोपे, मनीष रावल ,जयप्रकाश जोशी, यांनी देखील काही प्रश्न उपस्थित केले. बैठकीला जिल्हा परिषद चे केंद्रीय महाव्यवस्थापक संदीप पाटील, एमआयडीसी चे



प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी एल एस भड, पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव, मनपा शहर अभियंता संजय अग्रवाल, व विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते, मागील वर्षी २७डिसेंबर २०२३ रोजी एक झुम बैठक झाली होती, त्यामध्ये मनपा आयुक्त डॉ.अशोक करंजकर यांनी स्वतंत्र बैठक घेऊ असे सांगितले होते, परंतु निमा कडून आठ वेळा स्मरणपत्र घेऊन सुद्धा त्यांनी बैठक घेतली नव्हती, नाशिक महानगर पालिका आयुक्त पदाचा प्रभारी कार्यभार सध्या जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याकडे असून त्यांनी बैठकीच्या सुरुवातीलाच मनपाचे संजय अग्रवाल ,श्रीकांत पवार यांना खडे बोल सुनावले व बैठकीत झालेले प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे आदेश दिले. बैठकीपुढील २२ विषय मनपाशी निगडित असल्याने त्यांनी पुढील दहा दिवसात स्वतंत्र बैठक घेऊन त्यात या विषयावर चर्चा करणार असल्याचे सांगितले.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान आणि विकृत मानसिकता !!




मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा 26 ऑगस्ट 2024 रोजी कोसळला ! मानवतेचा मानबिंदू ढासळला !देशाची मान शर्मेने खाली गेली !शिवप्रेमींच्या काळजाला अगनित वेदना झाल्या!!

4 डिसेंबर 2023 रोजी प्रधानमंत्री नरेंद मोदी यांच्या हस्ते मोठा गाजावाजा करून या पुतळ्याचे अनावरण झाले होते. विश्वगुरूला खुश करण्यासाठी गल्लीतल्या राजकीय शिष्यांनी घाई गडबडीत हे काम पूर्ण केले होते. हे काम किती निकृष्ट दर्जाचे होते यावर आता चर्चा होत आहे. केवळ आठ महिण्यातच हा पुतळा कोसळल्यामुळे शिवप्रेमी मध्ये संतापाची लाट पसरली आहे .

शिवरायांचा पुतळा अशाप्रकारे कोसळण्याची ही जगातील पहिलीच घटना आहे .त्यामुळे शिवरायांचा अपमान झाला असून समाजात अस्वस्थता दाटली आहे. शिवप्रेमींचे आक्रंदण सुरू आहे. यातून मुजोर सत्ताकेंद्रांना सुरूंग लागला तर आश्चर्य वाटायला नको.

सत्ताधारी राज्यकर्ते मात्र मोकळ्या मनाने शिवरायांची, शिवप्रेमींची ,देशाची झालेल्या अक्षम्य चुकीबद्दल जाहीर माफी मागण्या ऐवजी वेगवेगळी कारणे देऊन या घटनेचे समर्थन करत आहेत. यापेक्षा मोठे स्मारक ,पुतळा उभारण्याची वल्गना करीत आहेत . खरं म्हणजे राष्ट्रपती, प्रधानमंत्री ,मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाबद्दल शिवरायांची माफी मागायला पाहिजे होती यातून त्यांचा शिवराया प्रती असलेला आदर दिसून आला असता . सत्तेबाहेरचे विरोधी राजकारणीही केवळ आम्हीच शिवरायांचे पाईक अशा अविर्भावात वर्तन करीत आहेत . दुर्दैवाने अपवाद वगळता या घटनेचे गांभीर्य कोणत्याही सत्तेतील वा सत्तेबाहेरीत राजकीय मुखंडाना नाही . केवळ राजकीय सत्ता केंद्रस्थानी ठेवून महामानव , मानवता हे विषय हाताळणे चुकीचे आहे. त्यातून विनाकारण समाज भरकटतो व मूळ विषय बाजूला राहतो.



छत्रपती शिवाजी महाराज पक्ष, देश, धर्म एवढ्या पुरते मर्यादित नाहीत तर ते वैश्विक मानवतेचा मानबिंदू आहेत. राष्ट्रभक्त,अंधभक्त, धर्माचे ठेकेदार, संस्कृतीरक्षक वगैरे म्हणणारे शिवरायांच्या अपमानातून विकृत आनंद घेत आहेत, हे या देशाचे दुर्दैव आहे! शिवाजी महाराज जिवंत असताना व आताही शिवरायांना, शिवविचारांना डसणारे विषारी नाग एकच आहेत. धर्माच्या नावाने हाकाटी पिटणारे अशावेळी कोणत्या बिळात जातात हा संशोधनाचा विषय आहे.

छत्रपती शाहू महाराजांनी जगातील पहिला शिवरायांचा पुतळा शिवाजीनगर, पुणे येथे उभारला .त्यावेळी विरोध करणाऱ्यांची ,शिवरायांच्या अपमानात आनंद शोधणाऱ्यांची जनुके एकच आहेत .जेम्स लेनने शिवरायांची बदनामी केली तेव्हा आता सत्तेबाहेर असलेले राज्यकर्ते तेंव्हा सत्तेत होते ,त्यांनी त्यावेळी बदनामीतील गुन्हेगारांना शासन नाही तर सन्मान दिला. गोरगरीब शेतकऱ्याच्या पोरांनी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून शिव विचारांच्या अस्मितेचा लढा उभारला .शिवरायांचा विचार जोपासला. हा इतिहास आहे.

शिवरायांच्या कपाळावर कृष्णा भास्कर कुलकर्णीच्या तलवारीची जखम दाखविणारा आपटे नावाचा शिल्पकार निच व दोषी आहेच परंतु त्याला काम देऊन सहकार्य करणारे राज्यकर्ते जास्त गुन्हेगार व दोषी आहेत!!


दोषी गुन्हेगारांना कडक शासन करा अशी मागणी शिवप्रेमीतून होत आहे .सरकार तसे आश्वासन देत आहे .परंतु वारा ,पाणी, समुद्र, निसर्ग यावर सगळी जबाबदारी टाकून दोषींना क्लीन चिट दिली जाईल .

किमान माणूस म्हणून तरी शिवरायांवर बेगडी शिवप्रेम दाखवू नका... स्वार्थासाठी शिवद्रोह्यांची हुजरेगिरी करू नका...काळ तुम्हाला कधीच माफ करणार नाही. सत्ता येते जाते. ती चिरंजीव नाही .माणूसही मृत्य आहे .ज्या छत्रपती शिवरायांमुळे आपले अस्तित्व ,अस्मिता आहे त्या शिवरायांसाठी तर सत्य बोला. सत्य लिहा.. सत्य वागा ..सत्याच्या बाजूने उभे रहा. सत्य म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज!!

एक लक्षात ठेवा .. कितीही बलाढ्य शत्रू आले.. कितीही नीचपणा केला.. कितीही षडयंत्र केले ..कितीही विष कालवण्याचा प्रयत्न केला..तरीही करोडो लोकांच्या काळजात व मनामनात व सृष्टीतील चराचरात शिवराय वसलेले आहेत. एक वेळ चंद्र सूर्य ही जातील परंतु छत्रपती शिवाजी महाराज हे नाव कधीच पुसले जाणार नाही ..!!

@ गंगाधर बनबरे, पुणे
28 ऑगस्ट 2024

## विश्वनाथ ईटकर यांचे निधन



केज । प्रतिनिधी

तालुक्यातील सोनेसांगवी येथील जेष्ठ नागरिक विश्वनाथ मारोती ईटकर वय ७० यांचे मंगळवार रोजी पहाटे वृद्धपकाळाने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर सोनेसांगवी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली असा मोठा परिवार आहे.ते आश्रूबा ईटकर यांचे वडील होत.

## विलेपार्ले येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलातील विद्यार्थ्यांचे नेमबाजीत नेत्रदिपक यश

मुंबई । प्रतिनिधी

नुकत्याच गोवा येथेपार पडलेल्या इंडिया ओपन कंपेटिशन (रायफल /पिस्तूल) प्रकारात विलेपार्ले येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलातील नेमबाज कु.श्रिया रवींद्र गोळे हिने १० मीटर पीप साइट रायफल नेमबाजी प्रकारात कास्य पदक पटकाविले आहे. श्रिया राष्ट्रीय नेमबाज असून तिला अजून परिश्रम करून भारताचे आंतर राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करायचे आहे. तर बंगलोर येथे पार पडलेल्या (सी.आय.एस.सी.ई) नॅशनल शूटिंग टूर्नामेंट मध्ये कु. श्लोक सतीश हजारे याने १० मीटर एअर रायफल प्रकारात १७ वर्षाखालील वयोगटात सुवर्ण पदक जिंकून स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया शूटिंग कंपेटिशन मध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. देशासाठी आंतर राष्ट्रीय पातळीवर स्वतः प्रतिनिधीत्व करण्याची श्लोक यांची इच्छा आहे. दोन्ही खेळाडूं नेमबाज प्रशिक्षक स्नेहल पापळकर कदम यांच्याकडून नेमबाजी चे प्रशिक्षण घेत आहेत.. प्रबोधनकार ठाकरे संकुलाचे अध्यक्ष मा.अरविंद रमेश प्रभू, संस्थेचे सचिव डॉ. मोहन राणे यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले आहे.



## आमदार भिमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून होत असलेल्या मराठवाड्यातील सर्वात मोठ्या कृषी प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा – गणेश शेवाळे

**पाटोदा (प्रतिनिधी)**

शेतकऱ्यांचे नेते मा.आ.भिमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून मराठवाड्यातील सर्वात मोठे आष्टी तालुक्यात दुसऱ्यांदा कृषी प्रदर्शन संपन्न होत आहे.यामध्ये भारतातील सर्वात उंच ५१ लाखाचा सोन्या नावाचा कोसा बैल प्रमुख आकर्षण असणार आहे. यासोबतच लाडक्या बहिणींसाठी उद्धव के.पी. प्रस्तूत महाराष्ट्रभर गाजत असलेला महिला भगिनींचा एकमेव आवडता कार्यक्रम खेळ पैठणीचा, शेतकऱ्यांच्या मनोरंजनासाठी रोज सायंकाळी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत पारंपारीक लोकगीते, लोककला,नाटक, शास्त्रीय संगीत, शेतकरी गीते, लोकनृत्य यांचे सादरीकरण करण्यात येतील.यासह बरेच काही असणार आहे. शेती व ग्रामीण भागातील बदलत्या तंत्राची महत्त्वपूर्ण माहिती मिळणार असल्याने आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघासह जिल्ह्यातील व्यावसायिक व शेतकरी वर्गाने,कृषी प्रदर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन गणेश शेवाळे यांनी केले आहे. आष्टी शहरात मा.आ.भिमरावजी धोंडे साहेब यांच्या संकल्पनेतून मराठवाड्यातील सर्वात मोठे राज्य स्तरीय कृषी प्रदर्शन दि .२९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयासमोर कृषी प्रदर्शन सभामंडपात संपन्न होत आहे.या प्रदर्शनाचे उद्घाटन कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे व लोकनेत्या आ. पंकजाताई मुंडे,आदर्श सरपंच पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.सांगली येथील व देशातील सर्वात उंच ५१ लाख रुपये किमंतीचा खिलार कोसा जातीचा सोन्या बैल प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने चार दिवस दररोज दुपारी १२ ते २ या वेळेत कृषी संबंधित तज्ञांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे.कृषी प्रदर्शनासाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या नावांमधून दर तासाला लकी ड्रॉ काढण्यात येईल व लकी शेतकऱ्यांला शेती उपयोगी भेट वस्तू देण्यात येईल. शेवटच्या दिवशी बंपर लकी ड्रॉ काढुन विजेत्याला बक्षीस दिले जाईल. कृषी प्रदर्शनात दुध उत्पादक शेतकऱ्यांसाठी वेगवेगळे



अत्याधुनिक मशिन, कुक्कुटपालन माहिती तसेच बॅंके मधून लोन कसे काढायचे यांची माहिती मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या मनोरंजनासाठी रोज सायंकाळी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत पारंपारीक लोकगीते, लोककला, नाटक, शास्त्रीय संगीत, शेतकरी गीते, लोकनृत्य यांचे सादरीकरण करण्यात येतील.आयोजक वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी संलग्न श्री छत्रपती,शाहु,फुले, आंबेडकर महाविद्यालय आष्टी आहेत. हे प्रदर्शन मोफत आहे त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी, व्यावसायिकांनी , नागरीकांनी लाभ घेण्याचे आवाहन गणेश शेवाळे यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077